# माझा जन्मच भाजपमध्ये झाला- पोटे

## प्रवीण पोटेंच्या राजीनाम्याची पोस्ट अफवांचा धुरळा उडवणारी



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** – भाजपचे ज्येष्ठ नेते आणि माजी पालकमंत्री प्रवीण पोटे यांनी पक्षाचा राजीनामा दिल्याची बातमी गुरुवारी अचानक सोशल मीडियावर झळकल्याने राजकीय वर्तुळात संभ्रमाचे वातावरण निर्माण झाले. काही वेळातच ही पोस्ट जिल्हाभर चर्चेचा विषय ठरली. मात्र, ही बातमी पूर्णपणे खोटी व दिशाभूल करणारी असल्याचे स्वत: प्रवीण पोटे यांनी स्पष्ट करताच अफवांचा फुगा फुटला. यावेळी प्रवीण पोटे यांनी दै.महासागर शी बोलताना आपली प्रतिक्रीया दिली की, माझा जन्मच भारतीय जनता पक्षातला आहे, त्यामूळे मी भाजपच्या शेवटच्या फळीत कार्यकर्ता म्हणून काम करत राहील.

पोटे पुढे म्हणाले की, भाजपमध्ये काही अतिक्रमण करण्याचा प्रयत्न करित आहे, त्यांना अतिक्रमण करण्यापासून मी अडवित असल्याने त्यांनी माझा असा अपप्रचार सुरु केला असल्याचे पोटे यांनी सांगितले. अमरावती महापालिका निवडणुकीनंतर भाजपच्या अंतर्गत घडामोडी, कार्यकर्त्यांमधील नाराजी आणि अपेक्षित यश न मिळाल्याची पार्श्वभूमी लक्षात घेता, या अफवेला अधिकच खतपाणी मिळाले. सन 2017 च्या तुलनेत यंदा भाजपच्या जागांमध्ये मोठी घट झाल्याने पक्षातील नेतृत्वावर टीका होत होती.

त्याच अनुषंगाने प्रवीण पोटे यांच्या भूमिकेबाबतही चर्चा सुरू होती. याच वातावरणाचा गैरफायदा घेत काही समाजकंटकांनी राजीनाम्याची खोटी माहिती पसरवल्याचे सांगितले जात आहे. दुपारी सुमारे अडीचच्या सुमारास एका व्हॉट्सॲप गटातून सुरू झालेली पोस्ट काही मिनिटांतच विविध सोशल मीडिया माध्यमांवर पोहोचली. काही ठिकाणी तर याला 'ब्रेकिंग न्यूज'चे स्वरूप देण्यात आले. त्यामुळे कार्यकर्ते, समर्थक आणि नागरिकांमध्ये संभ्रम निर्माण झाला.

दरम्यान, प्रवीण पोटे हे त्यांच्या महाविद्यालयातील कार्यक्रमात व्यस्त असताना त्यांना या अफवेची माहिती मिळाली.

त्यांनी तत्काळ प्रतिक्रिया दिली, त्यांच्या या खुलाशानंतर भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनीही राजीनाम्याच्या वृत्ताचे खंडन केले. या घटनेनंतर कार्यकर्त्यांमध्ये संतापाचे वातावरण असून, खोटी माहिती पसरवणाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी होत आहे. अफवांमुळे निर्माण झालेला संभ्रम दूर झाला असला, तरी या प्रकाराने राजकीय वातावरणात पुन्हा एकदा चर्चांना उधाण आले आहे.

## महिलेला कुऱ्हाडीने मारहाण

**अमरावती** – शेवती जहागीर येथे रविवारी दुपारी 1.30 वाजताच्या सुमारास घराच्या बांधकामाच्या वादातून एका महिलेला कुर्हाडीने मारहाण केल्याची घटना घडली आहे. या प्रकरणी नांदगावपेठ पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी महिला व आरोपी सुभाष राजुरकर (रा. शेवती जहागीर) हे एकाच गावातील शेजारी राहतात. घटनेच्या वेळी फिर्यादीच्या घराचे बांधकाम सुरू असताना काम पाहण्यासाठी दोन



महिला आल्या होत्या. त्यावेळी आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ करत, ही माझी जागा आहे, असे म्हणत कुर्हाडीने हल्ला केला. या हल्ल्यात फिर्यादी महिला जखमी झाली.

# महापौर आरक्षणाआधी अमरावतीत सत्तासमीकरणांचा खेळ रंगात

- भाजपचे गूढ मौन, मित्रपक्षांची हालचाल आणि संख्याबळाचे गणित
- शहराचे लक्ष गुरुवारच्या आरक्षणाकडे

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि.20 )**– महापौरपदाच्या आरक्षण गुरुवारी (22) जाहीर होणार आहे. तत्पूर्वी अमरावती महापालिकेतील राजकीय हालचालींना वेग आला आहे. प्रशासनाने निवडणूक प्रक्रियेची तयारी पूर्ण केली असली, तरी राजकीय पातळीवर मात्र अद्याप स्पष्ट चित्र समोर आलेले नाही. अमरावतीचा 17 वा महापौर कोण होणार, याबाबत शहरात उत्सुकता वाढली असून सध्या सर्वच पक्षांनी सावध भूमिका घेतल्याचे दिसत आहे.



महापालिकेतील सत्तासंघर्ष सध्या केवळ संख्याबळावर केंद्रीत झाला आहे. कोणत्या पक्षाकडे किती नगरसेवक आहेत, संभाव्य पाठिंबा कुठून मिळू शकतो आणि आरक्षण जाहीर झाल्यानंतर कोणते गट सक्रिय होतील, यावरच सत्ता स्थापनेचा मार्ग ठरणार आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, आरक्षण जाहीर होईपर्यंत कोणताही पक्ष उघडपणे भूमिका मांडण्याच्या मन:स्थितीत नाही. भाजपकडे सध्या सर्वांच्या नजरा लागल्या आहेत. निवडणूक निकालानंतर अद्याप पक्षाच्या प्रमुख नेत्यांकडून सत्ता स्थापनेबाबत ठोस संकेत न मिळाल्याने राजकीय वर्तुळात संभ्रम निर्माण झाला आहे. हे मौन रणनीतीचा भाग असल्याचे मानले जात असून, योग्य वेळी मोठा निर्णय जाहीर होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. काँग्रेसकडून समविचारी पक्षांशी चर्चा सुरू असल्याचा दावा करण्यात आला होता. मात्र प्रत्यक्ष संख्याबळाच्या आकडेवारीमुळे त्यांचे दावे कितपत प्रत्यक्षात उतरतील, याबाबत शंका व्यक्त केली जात आहे.

### कुणाची काय भूमिका

राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट)ने स्थानिक पातळीवर स्वतंत्र भूमिका घेतली आहे. काही पक्षांबरोबर सत्ता स्थापन न करण्याचा स्पष्ट इशारा दिल्याने संभाव्य युतींच्या गणितात आणखी गुंतागुंत वाढली आहे. युवा स्वाभिमान पक्षाने मागील निवडणुकीपेक्षा अधिक जागा जिंकून आपले राजकीय वजन वाढवले आहे. हा पक्ष सातत्याने भाजपचाच महापौर होईल, असा दावा करत असून त्यामुळे राजकीय चर्चांना अधिकच उधाण आले आहे. एआयएमआयएमने सध्या तटस्थ भूमिका स्वीकारली आहे. आरक्षण जाहीर झाल्यानंतरच ते आपली अंतिम भूमिका स्पष्ट करतील, असे संकेत आहेत. दोन्ही शिवसेना गटही सध्या शांत आहेत. निवडणुकीनंतर मिळालेल्या संख्याबळावर समाधानी राहत, योग्य संधीची वाट पाहण्याची भूमिका त्यांनी घेतल्याचे चित्र आहे.एकंदर पाहता, भाजपचे मौन, विविध पक्षांचे परस्परविरोधी संकेत आणि आरक्षणाची उत्सुकता या साऱ्यांमुळे अमरावतीतील महापौरपदाची लढत अधिकच रंजक बनली आहे. गुरुवारी जाहीर होणाऱ्या आरक्षणानंतरच शहराच्या राजकारणात स्पष्ट दिशा मिळेल, असे राजकीय जाणकारांचे मत आहे

# खदाणीत आढळला अज्ञात व्यक्तीचा कुजलेला मृतदेह

## दोन महिन्यांपूर्वी मृत्यू झाल्याची शक्यता

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** – नांदगाव पेठ पोलिस ठाण्याच्या हद्दीत येणाऱ्या एका खाणीत अज्ञात व्यक्तीचा कुजलेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आल्याची घटना उघडकीस आली आहे. सदर मृतदेह अंदाजे दोन महिन्यांपूर्वीचा असल्याचा प्राथमिक अंदाज असून, अद्याप मृतकाची ओळख पटलेली नाही. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, 3 नोव्हेंबर 2025 रोजी एका तक्रारदाराने आपले हॉटेल उघडण्यासाठी जात असताना मागील बाजूस कचरा टाकण्यासाठी खदाणीकडे गेले असता, पाण्यात एक मृतदेह तरंगताना दिसून आला. ही बाब तात्काळ नांदगाव पेठ पोलिसांना कळविण्यात आली. माहिती मिळताच पोलिसांचे पथक घटनास्थळी दाखल झाले व मृतदेह खदाणीतून बाहेर काढण्यात आला. मृतदेह पूर्णत: कुजलेल्या अवस्थेत असून पाण्यात दीर्घकाळ राहिल्यामुळे मृतकाचा चेहरा फुगलेला होता. मृतकाच्या अंगावर कथिया रंगाचा फुलबाही शर्ट तसेच हिरव्या रंगाचा लोअर असल्याची नोंद पोलिसांनी केली आहे. पंचनामा करून मृतदेह शवविच्छेदनासाठी जिल्हा सामान्य रुग्णालयात पाठविण्यात आला आहे. या



प्रकरणी नांदगाव पेठ पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद करून तपास सुरू केला असून, मृतकाची ओळख पटविण्यासाठी नागरिकांनी पुढे येऊन सहकार्य करावे, असे आवाहन हेड कॉन्स्टेबल शिरीष सावरकर यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे केले आहे.

# 'वीरचक्र'ने सन्मानित शरदचंद्र देशपांडे यांचे निधन

**अमरावती** – 1965 च्या भारत-पाक युद्धात पश्चिमी आघाडीवर प्राणांची पर्वा न करता अद्वितीय शौर्य गाजवणारे आणि त्या धाडसी कामगिरीसाठी 'वीरचक्र' सन्मान प्राप्त करणारे निवृत्त एअर व्हाईस मार्शल शरदचंद्र नरेश देशपांडे यांचे पुणे येथे वयाच्या 88 व्या वर्षी निधन झाले. त्यांच्या निधनाने देशाने एक पराक्रमी योद्धा, तर अमरावती जिल्ह्याने आपल्या अभिमानास्पद सुपुत्राला गमावले आहे. मुळचे दर्यापूर तालुक्यातील वडनेर गंगाई येथील रहिवासी असलेल्या देशपांडे यांनी फ्लाइट लेफ्टनंट म्हणून युद्धात अपूर्व धैर्य दाखवले. त्यांच्या शौर्याची दखल घेत केंद्र सरकारने त्यांना प्रतिष्ठित 'वीरचक्र' सन्मानाने गौरविले. अमरावती जिल्ह्यातून हा सन्मान मिळवणारे ते पहिले अधिकारी ठरले. त्यांचे बालपण व शिक्षण अमरावतीत झाले.



अमरावती रेल्वे स्थानकावर त्यांच्या शौर्याच्या स्मरणार्थ उभारलेली गौरवशिला आजही देशभक्तीची प्रेरणा देते. त्यांच्या पश्चात पत्नी, मुलगा, मुलगी, नातवंडे व आप्त परिवार आहे.

# जिल्हा विकास आराखडा तयार; शनिवारी अंतिम चर्चा

## 434.71 कोटींचा आराखडा मंजुरीच्या मार्गावर

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 20 )** – आर्थिक वर्ष 2026-27 साठी जिल्हा वार्षिक विकास आराखडा तयार करण्यात आला असून, त्यावर अंतिम चर्चा करण्यासाठी येत्या शनिवारी (ता. 24) पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची महत्त्वपूर्ण बैठक आयोजित करण्यात आली आहे. शासनाने अमरावती जिल्ह्यासाठी 434.71 कोटी रुपयांची कमाल आर्थिक मर्यादा निश्चित केली असून, या आराखड्याला मंजुरी मिळण्याच्या प्रक्रियेला वेग आला आहे. विविध यंत्रणांकडून प्राप्त होणाऱ्या प्रस्तावांनुसार आराखड्यात वाढीव निधीची मागणी समाविष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. राज्य शासनाने जिल्ह्याचे भौगोलिक क्षेत्रफळ व लोकसंख्या लक्षात घेऊन ही मर्यादा निश्चित केली आहे. जिल्ह्यातील विविध विभाग, स्थानिक स्वराज्य संस्था व शासकीय यंत्रणांकडून विकासकामांसाठी आलेले प्रस्ताव या बैठकीत तपासून आवश्यक तरतुदी केल्या जाणार आहेत. त्यानंतर पालकमंत्र्यांची मंजुरी घेऊन हा आराखडा अर्थमंत्री अजित पवार यांच्या अधिपत्याखालील राज्य नियोजन विभागाकडे सादर केला जाणार आहे.

राज्याचा अर्थसंकल्प 23 फेब्रुवारी रोजी सादर होणार असल्याने, त्याआधी जिल्हा विकास आराखडा सादर करणे अनिवार्य आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने तयारीला वेग दिला आहे. चालू आर्थिक वर्ष 2025ङ्क26 मध्ये 527 कोटींचा आराखडा मंजूर करण्यात आला होता. यंदा स्थानिक स्वराज्य संस्थांच्या सभा अस्तित्वात आल्याने व नव्या विकासकामांच्या मागण्या वाढल्याने आगामी वर्षात तरतुदीत वाढ होण्याची शक्यता आहे.

चालू वर्षातील मंजूर 527 कोटींपैकी किती निधी खर्च झाला, किती प्रकल्प पूर्ण झाले, किती प्रगतिपथावर आहेत व किती निधी शिल्लक आहे, याचा सविस्तर आढावा बैठकीत घेतला जाणार आहे. 31 मार्चपूर्वी निधी खर्च होणे आवश्यक असल्याने, खर्चाच्या प्रगतीवरच पुढील वर्षातील वाढीव मागणी अवलंबून राहणार आहे.

# एकताई व बोरदा येथील शिक्षक आजही उशिरा पोहोचले!

## मेळघाटातील शिक्षणाची दयनीय अवस्था; अधिकाऱ्यांची अनास्था

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, ( दि.20 )**– मेळघाटातील दुर्गम भागातील एकताई व बोरदा येथील शाळांमधील शिक्षक नियमित वेळेवर उपस्थित राहत नसल्याच्या तक्रारी सातत्याने समोर येत आहेत. या संदर्भात आज वृत्त प्रकाशित झाल्यानंतरही परिस्थितीत कोणताही बदल न होता शिक्षक पुन्हा उशिरा शाळेत पोहोचल्याचे निदर्शनास आले. त्यामुळे या परिसरातील शिक्षणाची अवस्था अधिकच दयनीय बनली असून आदिवासी विद्यार्थ्यांचे मोठ्या प्रमाणात शैक्षणिक नुकसान होत आहे.

एकताई व बोरदा ही गावे अतिशय दुर्गम भागात असल्याने तेथे अधिकारी व पदाधिकारी क्वचितच पोहोचतात. याचाच गैरफायदा घेत शिक्षकांकडून मनमानी कारभार सुरू असल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. शाळा वेळेवर न सुरू होणे, शिक्षकांची अनुपस्थिती किंवा विलंब यामुळे विद्यार्थ्यांच्या अभ्यासक्रमावर विपरीत परिणाम होत असून पालकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे.

या गंभीर प्रकाराकडे संबंधित शिक्षण विभागाने तातडीने लक्ष देऊन चौकशी करावी व दोषी शिक्षकांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. मेळघाटातील दुर्गम भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार व नियमित शिक्षण मिळावे यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलणे आवश्यक आहे.

### गटशिक्षणाधिकाऱ्यांचा खुलासा

एकताई येथील परिस्थितीबाबत गटशिक्षणाधिकारी भटेसिंग गिरासे (चिखलदरा) यांनी सांगितले की, ध्वजासाठी लागणारा लोखंडी खांब दुरुस्तीसाठी नेण्यात आला होता. एक शिक्षक मेडिकल कारणास्तव अमरावती येथे गेला होता. वाहतूक अडचणीमुळे उशीर झाला असल्याचे स्पष्टीकरण त्यांनी दिले.

# शनिवारी शहराचा पाणीपुरवठा दिवसभर बंद

**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 20 )** – अमरावती व बडनेरा शहरवासीयांना शनिवारी, 24 जानेवारी रोजी दिवसभर पाणीपुरवठा बंद राहणार आहे. अमरावती शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या सिंभोरा हेडवर्क्स येथे महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी (महावितरण) मार्फत 132 के.व्ही. व 33 के.व्ही. मोर्शी उपकेंद्रात नियोजित देखभाल व दुरुस्तीचे काम करण्यात येणार आहे. या कालावधीत सिंभोरा हेडवर्क्सचा विद्युत पुरवठा व पंपिंग व्यवस्था पूर्णत: बंद ठेवण्यात येणार असल्याने दोन्ही शहरांचा पाणीपुरवठा खंडित होणार आहे.

महावितरणकडून करण्यात येणाऱ्या या दुरुस्तीमुळे पाणी उपसा होऊ शकणार नसल्याने अमरावती व बडनेरा शहरातील सर्व भागांमध्ये सकाळपासून रात्रीपर्यंत पाणी मिळणार नाही, अशी माहिती अमरावती महानगर पाणीपुरवठा योजनेचे (मजीप्रा) कार्यकारी अभियंता यांनी दिली आहे. नागरिकांनी आवश्यक पाणीसाठा आधीच करून ठेवावा तसेच उपलब्ध पाण्याचा काटकसरीने व योग्य वापर करावा, असे आवाहन मजीप्राकडून करण्यात आले आहे. देखभाल काम पूर्ण झाल्यानंतर पुढील दिवशी पाणीपुरवठा पूर्ववत सुरळीत होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

## आरोपीस दोन दिवसांची पोलिस कोठडी

**चांदूर बाजार,( दि.20 )**– निलेश बदूकले हत्याकांडातील आरोपी अजय लंगोटे याला मंगळवार, 20 जानेवारी रोजी चांदूर बाजार येथील न्यायालयात हजर करण्यात आले. प्रकरणाचा अधिक तपास करण्यासाठी पोलिसांनी पाच दिवसांच्या पोलिस कोठडीची मागणी केली होती. मात्र न्यायालयाने दोन दिवसांची पोलिस कोठडी मंजूर केली आहे. येथे 19 जानेवारी रोजी वाहनाने धडक देऊन व्यावसायिक निलेश बदूकले यांची हत्या झाल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. या प्रकरणात पोलिसांनी आरोपी अजय लंगोटे याला अटक केली असून घटनेच्या सर्व बाजूंनी सखोल तपास सुरू आहे. पोलिसांकडून मिळालेल्या माहितीनुसार, आरोपीने जाणूनबुजून वाहनाने धडक देत निलेश बदूकले यांचा जीव घेतल्याचा प्राथमिक संशय आहे. घटनेनंतर चांदूर बाजार पोलीस ठाण्याच्या पथकासह अमरावती स्थानिक गुन्हे शाखेचे पथकही तपासात सहभागी झाले आहे.

# जिल्हा परिषदेत अत्याधुनिक 'वॉर रूम' कार्यान्वित

## क्षणात निर्णय, थेट संवाद; प्रशासन अधिक गतिमान व प्रभावी




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, ( दि. 20 )** – जिल्हा परिषद प्रशासन अधिक वेगवान, पारदर्शक आणि तंत्रज्ञानस्नेही करण्याच्या दृष्टीने जिल्हा परिषद मुख्यालयात अत्याधुनिक 'वॉर रूम' सुरू करण्यात आली आहे. या माध्यमातून जिल्हा परिषद स्तरावरील सर्व विभागप्रमुख अधिकारी आणि पंचायत समितीतील गटविकास अधिकाऱ्यांना एका डिजिटल व्यासपीठावर जोडण्यात आले आहे. त्यामुळे प्रशासनातील संवाद अधिक सुलभ झाला असून निर्णयप्रक्रियेला गती मिळाली आहे.

यापूर्वी महत्त्वाच्या विषयांवर चर्चा करणे, सूचना देणे किंवा तातडीचे आदेश पोहोचवण्यासाठी फोन कॉल, ई-मेल किंवा प्रत्यक्ष बैठकांवर अवलंबून राहावे लागत होते. या प्रक्रियेत वेळ वाया जात होता. आता 'वॉर रूम'च्या माध्यमातून एकाचवेळी सर्व संबंधित अधिकाऱ्यांशी थेट संपर्क साधणे शक्य झाले आहे. त्यामुळे समस्या समजताच त्वरित उपाययोजना ठरवून त्या अंमलात आणणे अधिक सुलभ झाले आहे.

मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानाअंतर्गत जिल्हास्तरीय यंत्रणा अधिक सक्षम करण्यासाठी या वॉर रूमचा वापर केला जात आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी तसेच विविध विभागांचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी या वॉर रूमच्या माध्यमातून नियमित आढावा घेत आहेत. यामुळे कामकाजावर सतत लक्ष ठेवणे आणि जबाबदारी निश्चित करणे सोपे झाले आहे.

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी संजीता महापात्र यांच्या संकल्पनेतून या वॉर रूमची उभारणी करण्यात आली असून, त्यांच्या हस्ते तिचे उद्घाटन झाले. यावेळी उपमुख्य कार्यकारी अधिकारी बाळासाहेब बायस, कार्यकारी अभियंता दिनेश गायकवाड, गटविकास अधिकारी सुदर्शन तुपे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

विशेष म्हणजे तालुका स्तरावरही पंचायत समिती मुख्यालयात अशाच प्रकारच्या वॉर रूम सुरू करण्यात आल्या आहेत. त्या माध्यमातून शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे, ग्रामपंचायती आणि इतर महत्त्वाच्या यंत्रणांना जोडण्यात आले आहे. त्यामुळे ग्रामीण भागातील प्रश्न थेट जिल्हा स्तरावर मांडता येत असून त्यावर त्वरित निर्णय होऊ शकतो.

### तातडीच्या समस्या, तात्काळ उपाय

पावसाळ्यात पाणीपुरवठ्यातील अडचणी, साथीचे आजार, दवाखान्यांतील औषधांचा तुटवडा, डॉक्टर व कर्मचाऱ्यांची अनुपस्थिती, घरकुल योजना किंवा ग्रामस्तरावरील किरकोळ वाद यांसारख्या बाबींवर जलद निर्णय घेण्यासाठी 'वॉर रूम' प्रभावी ठरत आहे. प्रत्यक्ष माहिती मिळताच संबंधित अधिकाऱ्यांना सूचना देऊन तातडीने कारवाई करण्याची व्यवस्था यामुळे शक्य झाली असल्याचे प्रशासनाने नमूद केले आहे.

# ई-केवायसीच्या गोंधळात 'लाडकी बहीण'योजना अडकली

## 60 टक्के महिलांना हप्ता नाही ■ विदर्भात संतापाचा उद्रेक, सरकारच्या भूमिकेवर प्रश्नचिन्ह



**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती,( दि.20 )** – महायुती सरकारची गाजलेली 'लाडकी बहीण' योजना सध्या मोठ्या अडचणीत सापडली असून ई-केवायसी प्रक्रियेतील गोंधळामुळे राज्यातील सुमारे 60 टक्के पात्र महिलांना नोव्हेंबर व डिसेंबर 2025 चा प्रत्येकी 1,500 रुपयांचा हप्ता अद्याप मिळालेला नाही. जानेवारी महिना संपत आला तरी जानेवारीचा हप्ताही खात्यात जमा न झाल्याने महिलांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.

महानगर पालिका निवडणुकीपूर्वी डिसेंबर व जानेवारीचा हप्ता एकत्र देण्याची घोषणा करण्यात आली होती. मात्र विरोधकांच्या आक्षेपानंतर केवळ डिसेंबरचा हप्ता देण्यात आला. आता जिल्हा परिषद निवडणुकांचे टप्पे सुरू असल्याने, पुन्हा मतदानाच्या आधी घोषणा करून त्याचा राजकीय फायदा घेण्याचा प्रयत्न होईल, अशी चर्चा सुरू आहे. त्यामुळे योजना निव्वळ राजकीय साधन बनल्याचा आरोप महिलांकडून केला जात आहे.

### विविध जिल्हाधिकारी कार्यालयावर धडक

विदर्भातील भंडारा, यवतमाळ, बुलढाणा व अमरावती जिल्ह्यांमध्ये महिला जिल्हाधिकारी कार्यालयात धडक देत आहेत. हातात अर्ज, डोळ्यांत संताप आणि प्रश्न एकच आमचा हप्ता कुठे अडला? मात्र सरकारकडून ठोस उत्तर मिळत नसल्याने नाराजी वाढत चालली आहे.ज्या महिलांनी महायुतीला मतदान करून सत्तेत आणले, त्यांनाच आज आपल्या हक्कासाठी संघर्ष करावा लागत असल्याने सरकारच्या विश्वासार्हतेवर गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे. सत्तेसाठी आश्वासने दिली जातात आणि सत्ता मिळाल्यावर नियम-शर्तींचे ओझे टाकले जाते, असा थेट आरोप लाभार्थी महिलांकडून होत आहे. दरम्यान, लाडकी बहीण योजना बंद पडू देऊ नये, अशी जोरदार मागणी होत आहे. प्रलंबित सर्व हप्ते तातडीने जमा न केल्यास आंदोलन तीव्र करण्यात येईल, असा इशाराही महिलांनी दिला आहे. व्होट बँक संपली की बहिणींची मायाही संपली का? असा सवाल आता सरकारकडे केला जात आहे.

# गुजरी बाजारात मांज्याने चिमुकल्याचा गळा कापला

## मांजा उडविणाऱ्यावर कठोर कारवाई करा; वडिलांची पोलिसांत तक्रार

**महासागर प्रतिनिधी**

**वरूड,( दि.20 )-** बेनोडा शहीद येथील गुजरी बाजार परिसरात सोमवारी दुपारी एक हृदयद्रावक व धक्कादायक घटना घडली. अभिकेत व मनीषा गोहाड यांचा एकुलता एक मुलगा दिव्यराज गोहाड हा सायकल चालवत असताना हवेत लोंबकळणाऱ्या घातक मांज्याने त्याचा गळा कापला. सुदैवाने या चिमुकल्याला जास्त हानी झाली नाही. या घटनेमुळे परिसरात खळबळ उडाली असून नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.



दिव्यराज सायकलवरून बाजार परिसरात फिरत असताना अचानक त्याच्या गळ्याला मांज्याचा जोरदार फटका बसला. सुरुवातीला गळा दुखत असल्याचे त्याने आई-वडिलांना सांगितले. मात्र गळ्यावर खोल जखम दिसताच प्रकरणाचे गांभीर्य लक्षात आले. तातडीने त्याला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले. सुदैवाने वेळीच उपचार मिळाल्याने त्याचा जीव वाचला असला तरी ही घटना गंभीर असून निष्पाप बालकाच्या जीवाशी खेळ झाला, अशी भावना नागरिक व्यक्त करीत आहेत.या घटनेनंतर दिव्यराजचे वडील अभिकेत गोहाड यांनी पोलिसांकडे धाव घेऊन मांजा उडविणारे तसेच त्याची विक्री करणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी केली आहे. मनाई असूनही चायनीज व नायलॉन मांजा खुलेआम वापरला जातो. हा मांजा अत्यंत तीक्ष्ण व जीवघेणा असून तो केवळ माणसांसाठीच नव्हे तर पक्षी व प्राण्यांसाठीही घातक आहे. यामुळे अनेक निष्पापांचे प्राण धोक्यात येत आहेत, अशी तीव्र भावना त्यांनी व्यक्त केली.

### प्रशासनाचे दुर्लक्ष

गुजरी बाजार हा वर्दळीचा परिसर असून येथे लहान मुले, महिला, नागरिक व वाहने मोठ्या प्रमाणात ये-जा करतात. अशा ठिकाणी मांज्यासारख्या घातक साहित्याचा वापर होणे अत्यंत गंभीर बाब असून प्रशासनाच्या दुर्लक्षावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. यापूर्वीही मांज्यामुळे अपघात व जीवितहानीच्या घटना घडल्या आहेत. तरीही त्यावर ठोस उपाययोजना होत नसल्याची खंत नागरिक व्यक्त करीत आहेत. या घटनेनंतर परिसरातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते व पालकांनी चायनीज व नायलॉन मांज्यावर पूर्ण बंदीची प्रभावी अंमलबजावणी, त्याची विक्री करणाऱ्यांवर कारवाई तसेच मांजा उडविणाऱ्यांविरोधात कठोर दंडात्मक कारवाईची मागणी केली आहे. पोलिसांनी या प्रकरणाची दखल घेत तपास सुरू केला असून दोषींवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे आश्वासन दिले आहे.

# देवस्थाने स्थानिक नागरिकांसाठी खुली करावीत!

## मेळघाट व्याघ्र प्रकल्पाकडे माजी आमदार राजकुमार पटेल यांची मागणी




व्याघ्र प्रकल्पाचे अधिकारी 'कोअर एरिया'चे कारण देत देवस्थानांवर जाण्यास बंदी घालत आहेत. पूजा-अर्चा करू दिली जात नसल्याने लोकांच्या धार्मिक भावना दुखावल्या जात आहेत. प्रशासनाने स्थानिकांचा विचार न करता पावले उचलल्यास वनविभाग व नागरिकांमध्ये संघर्ष निर्माण होऊ शकतो.



**राजकुमार पटेल, माजी आमदार.**

**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.20 )** - चिखलदरा व धारणी तालुक्यातील आदिवासी बांधव शेकडो वर्षांपासून मेळघाट परिसरात वास्तव्यास आहेत. निसर्गालाच देव मानून जगणारी त्यांची स्वतंत्र संस्कृती असून, जंगलातील देवस्थाने ही त्यांच्या श्रद्धा, परंपरा व अस्तित्वाची ओळख आहेत. मात्र, मेळघाट व्याघ्र प्रकल्प स्थापन झाल्यानंतर नियम अधिक कडक करण्यात आले असून, याचा थेट परिणाम आदिवासींच्या धार्मिक व सांस्कृतिक हक्कांवर होत असल्याचा आरोप होत आहे. देवस्थानांपर्यंत जाण्यावरही निर्बंध घालण्यात आल्याने नागरिकांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे.

या पार्श्वभूमीवर मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल यांनी जिल्हाधिकारी अमरावती तसेच मुख्य वनसंरक्षक व मेळघाट व्याघ्र प्रकल्पाचे क्षेत्र संचालक यांना निवेदन सादर केले. तारू बांधा येथील कांदरी बाबा हनुमान मंदिर, भूमका बाबा सेमाडोह, डवरा देव बाबा हतरू, नरसिंग बाबा कोकमार आणि शिवपिंड सेमाडोह या पाच प्रमुख देवस्थानांवर स्थानिक नागरिकांना जाण्यास अडवू नये, तसेच त्यांना पूजा-अर्चा करण्याची मुभा द्यावी, अशी ठाम मागणी त्यांनी केली. ही सर्व स्थाने आदिवासी बांधवांची पारंपरिक श्रद्धास्थाने असून, ती कोणत्याही प्रकल्पामुळे बंदिस्त केली जाणे अन्यायकारक असल्याचे पटेल यांनी स्पष्ट केले. देवस्थानांवर बंदी घातल्यामुळे व्याघ्र प्रकल्प व वनविभागाबाबत नागरिकांमध्ये नाराजी वाढत असून, यामुळे कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याचा इशाराही त्यांनी दिला.

# मराठी भाषा विद्यापीठाच्या पहिल्या परीक्षेस सुरवात

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )-** अमरावती येथे कार्यरत देशातील पहिल्या मराठी भाषा विद्यापीठाच्या प्रथम सत्राच्या पहिल्या परीक्षेस सोमवार, दि. 19 जानेवारीपासून सुरूवात झाली आहेत. विद्यापीठाच्या स्थापनेनंतरच्या या पहिल्याच परीक्षा असल्याने विद्यार्थी आणि व्यवस्थापनामध्ये आनंदाचे वातावरण आहे.पहिलेच वर्ष असल्याने विद्यापीठाने चार अभ्यासक्रम सुरू केले आहेत. यात कला स्नातक (बी.ए.) भाषा व लिपीशास्त्र, प्रादर्शिक कला स्नातक (बी.पी.ए. नाटक), स्नातकोत्तर मराठी (अभिजात भाषा) आणि स्नातकोत्तर मानसशास्त्र या अभ्यासक्रमांचा समावेश आहे. विद्यापिठाचे पहिलेच वर्ष असतानाही 49 विद्यार्थ्यांनी या अभ्यासक्रमात प्रवेश घेतला. अभ्यागत प्राध्यापकांच्या सहकार्याने प्रथम सत्राचे वर्ग सुरू करण्यात आले. कालपासून या सर्व चार अभ्यासक्रमांच्या पहिल्या सत्राची परीक्षा सुरळीतपणे सुरू झाली आहे. याचा विद्यापीठातील सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी आनंद व्यक्त केला. विद्यापीठाचा प्रारंभ असल्यामुळे अनेक विद्यार्थ्यांच्या मनात धाकधूक होती, परंतु विद्यापीठ व्यवस्थापनाने तज्ज्ञ अभ्यागत प्राध्यापकांना निमंत्रित करून त्यांच्याकडून अभ्यासक्रम पूर्ण करून घेतला. त्यामुळे



विद्यापीठातील विद्यार्थीवर्ग सुखावला असून विद्यापीठाबद्दलचा आत्मविश्वास वाढला आहे.

अनेक अडचणी असतानाही विद्यापीठाला एक वर्ष पूर्ण व्हायच्या आतच या चार अभ्यासक्रमांसाठी प्रवेश प्रक्रिया राबविली. विद्यार्थ्यांनी उत्तम प्रवेशास प्रतिसाद दिला. अभ्यासकांनी विद्यापीठाच्या अभ्यासक्रमांची मांडणी केली असल्यामुळे विद्यार्थ्यांना त्यांच्या भविष्यकाळात या अभ्यासक्रमांचा निश्चितच उपयोग होणार आहे, अशी भावना विद्यार्थ्यांनी व्यक्त केली. पुढील वर्षी नवे अभ्यासक्रम विद्यापीठ सुरू करणार असल्याचे विद्यापीठाच्या कला व साहित्य प्रशालेचे अधिष्ठाता व प्रभारी परीक्षा नियंत्रक डॉ. कोमल ठाकरे यांनी सांगितले.

## सुरेश धनोडकर यांचे निधन

**चांदूर रेल्वे-** येथील मूळ रहिवासी व एसटी डेपोचे माजी वाहक सुरेश धनोडकर (वय 84) यांचे अमरावती येथील सामरा नगर मधील त्यांच्या राहत्या घरी निधन झाले. ते अमरावती येथील प्रसिद्ध डॉक्टर सागर धनोडकर यांचे



वडील होत. त्यांच्या पश्चात एक मुलगा व एक मुलगी असा परिवार आहे. त्यांच्या निधनाने परिसरात हळहळ व्यक्त होत आहे. त्यांच्या पार्थिवावर 21 जानेवारी रोजी सकाळी दहा वाजता अंत्यसंस्कार करण्यात येणार आहेत. दु:खावर मात करत डॉक्टर सागर धनोडकर यांनी वडिलांचे नेत्रदान करून सामाजिक बांधिलकीचे दर्शन घडविले.

## चाकूसह तरुण अटकेत

**अमरावती.** लोहा बाजारात पोलिसांनी कारवाई करत आरोपी वसीम खान खान याच्याकडून चाकू जप्त केला.

# चांदूरबाजार नगरपरिषदेच्या सर्व समित्या बिनविरोध

## विविध पदांवर निवड

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर बाजार,( दि.20 )** - येथील नगरपरिषदेच्या सर्व समित्यांची निवड बिनविरोध पार पडली असून, या प्रक्रियेमुळे नगरपरिषदेत समाधानाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. बांधकाम समितीच्या सभापतीपदी आबू वानखडे, शिक्षण, क्रीडा व सांस्कृतिक समितीच्या सभापतीपदी तन्वीर ताज तर महिला व



बालकल्याण समितीच्या सभापतीपदी कल्याणी हेमंत कोंडे यांची बिनविरोध निवड करण्यात आली. महिला व बालकल्याण समितीच्या उपसभापतीपदी कनिजा फातेमा जमील अहमद यांची निवड झाली.

तसेच स्थायी समितीचे नामनिर्देशित सदस्य म्हणून सचिन रमेशराव खुळे व ॲड. आबीद हुसैन यांची निवड करण्यात आली. सर्व पदाधिकाऱ्यांची निवड एकमताने झाल्याने नगरपरिषदेतील सुसंवाद आणि सहकार्याची भावना अधोरेखित झाली आहे.

नव्याने निवडून आलेल्या सर्व पदाधिकाऱ्यांचे विविध स्तरांतून अभिनंदन होत असून, शहराच्या सर्वांगीण विकासासाठी पारदर्शक व प्रभावी कामकाज करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला आहे. नगरपरिषदेच्या माध्यमातून नागरिकांच्या मूलभूत सुविधा, स्वच्छता, पायाभूत सुविधा व सामाजिक उपक्रमांना गती देण्याचे आश्वासनही त्यांनी दिले आहे.

# सर्व उमेदवारांना 14 फेब्रुवारी पर्यंत खर्च सादर करणे बंधनकारक

## महानगरपालिका निवडणूक

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, ( दि.20 )-** महानगरपालिका निवडणुकीत सहभागी झालेल्या सर्व उमेदवारांनी विजयी, पराभूत तसेच माघार घेतलेल्या उमेदवारांनीही आपला निवडणूक खर्च दि. 14 फेब्रुवारी 2026 पर्यंत सादर करणे बंधनकारक असल्याचे प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे. निवडणूक खर्च वेळेत सादर न केल्यास संबंधित उमेदवारांना पुढील पंचवार्षिक निवडणुकांमध्ये गंभीर अडचणींना सामोरे जावे लागू शकते, असा इशाराही देण्यात आला आहे.

निवडणूक आयोगाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार उमेदवारांनी खर्चाचा तपशील निर्धारित नमुन्यात सादर करणे आवश्यक आहे. यासोबतच 100 रु. च्या स्टँपवर खर्चाबाबतचे प्रतिज्ञापत्र (ॲकफिडेव्हिट) सादर करून त्याची पोहोच (रिसीट)घेणेही अनिवार्य आहे. खर्च सादरीकरणाची ही प्रक्रिया पूर्ण न केल्यास उमेदवार अपात्र ठरण्याची शक्यता नाकारता येत नाही, असेही अधिकाऱ्यांनी



सांगितले. निवडणूक प्रक्रियेत पारदर्शकता राखणे, खर्चावर नियंत्रण ठेवणे आणि लोकशाही मूल्यांचे पालन करणे या उद्देशाने ही अट लागू करण्यात आली आहे. अनेक वेळा विजयानंतर किंवा पराभवानंतर खर्च सादरीकरणाकडे दुर्लक्ष केले जाते. मात्र, कायद्याने ही जबाबदारी सर्व उमेदवारांवर समानपणे लागू असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. दरम्यान, खर्च सादरीकरणासाठी उमेदवारांनी संबंधित निवडणूक खर्च निरीक्षक किंवा महानगरपालिका कार्यालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शेवटच्या दिवसाची प्रतीक्षा न करता वेळेत प्रक्रिया पूर्ण करावी, जेणेकरून अनावश्यक तांत्रिक अडचणी टाळता येतील, असेही प्रशासनाकडून सांगण्यात आले आहे. सर्व उमेदवारांनी या सूचनेची गांभीर्याने नोंद घ्यावी असे आवाहन करत प्रशासनाने वेळेत खर्च सादर करण्याचे निर्देश दिले आहेत.

# शेतमजूर युनियन माकपची तहसीलवर धडक

## 'जी रामजी' हटाव मनरेगा बचावची केली मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**तिवसा,( दि.20 )** - 'जी रामजी' हटाव मनरेगा बचाव, या मुख्य मागणी सोबतच ईतरही मागण्यांसाठी शेतमजूर युनीयन लालबावटा व मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षा तर्फे जोरदार मोर्चा निदर्शने आंदोलन करण्यात आले. या आंदोलनाचे नेतत्व माकप तालुका सचीव व शेतमजूर युनियन जिल्हा सचिव दिलीप शापामोहन, किसान सभेचे जिल्हा सचिव महादेव गारपवार यांनी केले.




तिवसा तालुक्यात मनरेगाची कामे सुरू करा, घरकुलासाठी जागा द्या व घरकुल बांधून द्या, श्रावण बाळ, संजय गांधी योजनेचे मानधन दहा हजार रु. द्या, लाडक्या बहीणीचे बंद केलेले मानधन सुरू करून 3 हजार दरमहा मानधन द्या आदी मागण्यासाठी तिवसा तहसिल कार्यालयावर जोरदार मोर्चा काढून निदर्शने करण्यात आले. तिवसा तालुक्यातून शेकडो आंदोलनकर्ते सहभागी झाले होते . तहासील कचेरीवर मागण्या संदर्भात जोरदार नारेबाजी करण्यात आली. दिलीप शापामोहन, महादेव गारपवार, सुभाष खांडेकर, अजय गारपवार, शोभा गोंडाने , सुरेश भारती, अशोक राऊत, पुष्पा सौदर्यकर, भाष्कर डाखोरे, रामगोपाल निमावत, अंकुश वाघ, सुरेश मोरघडे, कैलास डोफे, बेबी सुरजुसे आदींचा मोठया संख्येने सहभाग होता. शेवटी लालबावटा जिंदाबादचे घोषणेत आंदोलनाची सांगता करण्यात आली.

# प्रजासत्ताक दिनाचा सोहळा यंदा पोलीस मुख्यालय मैदानावर

**अमरावती** - भारताच्या 77 व्या प्रजासत्ताक दिनाचा मुख्य शासकीय ध्वजारोहण सोहळा यावर्षी पोलीस मुख्यालय, अमरावती शहर परेड मैदान येथे आयोजित करण्यात आला आहे. हा कार्यक्रम 26 जानेवारी 2026 रोजी सकाळी 9.15 वाजता पार पडणार आहे.

दरवर्षी प्रजासत्ताक दिनाचा मुख्य सोहळा अमरावती येथील जवाहरलाल नेहरू स्टेडियम येथे साजरा केला जातो. मात्र, या स्टेडियमवर 400 मीटर रनिंग ट्रॅकचे काम सुरू आहे. या कामामुळे यावर्षी कार्यक्रम घेणे शक्य नसल्याचे सार्वजनिक बांधकाम विभागाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे 26 जानेवारी 2026 चा सोहळा पोलीस मुख्यालय परेड मैदानावर घेण्यात येणार आहे, असे निवासी उपजिल्हाधिकारी संतोष काकडे यांनी कळविले आहे.

# उर्दू माध्यमातून शिक्षण घेतले तरी करिअरच्या संधी अपार - फैजान खान

## चांदूर रेल्वेतील न.प. उर्दू शाळेत 'द ग्रँड एज्युकेशनल इव्हेंट 2026'

**महासागर प्रतिनिधी**

**चांदूर रेल्वे, ( दि.20 )** - उर्दू माध्यमातून शिक्षण घेतले म्हणून करिअरच्या संधी कमी होत नाहीत. दहावी व बारावीनंतर विद्यार्थ्यांसमोर शिक्षण, कौशल्य आणि करिअरचे अनेक मार्ग खुले असतात. योग्य मार्गदर्शन, आत्मविश्वास आणि सातत्य ठेवल्यास कोणत्याही क्षेत्रात यश मिळवता येते, असे प्रतिपादन ग्लोबल स्पोकन इंग्लिश अँड पर्सनॅलिटी डेव्हलपमेंट इन्स्टिट्यूट, अमरावतीचे संस्थापक व संचालक फैजान खान यांनी केले.

नगर परिषद मौलाना अबुल कलाम आझाद उर्दू पूर्व माध्यमिक व माध्यमिक शाळा आणि माजी विद्यार्थी संघ यांच्या संयुक्त विद्यमाने शनिवारी (ता.17) उर्दू शाळेच्या मैदानावर आयोजित 'द ग्रँड एज्युकेशनल इव्हेंट 2026' या कार्यक्रमात ते प्रमुख मार्गदर्शक म्हणून बोलत होते.

यावेळी त्यांनी दहावी-बारावीनंतरचे शिक्षण, व्यावसायिक अभ्यासक्रम, कौशल्याधारित प्रशिक्षण, स्पर्धा परीक्षा, स्पोकन इंग्लिश, व्यक्तिमत्त्व विकास तसेच आधुनिक तंत्रज्ञानाशी निगडित करिअर संधींबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून मोहम्मद अनिस शेख गफूर (सौदागर) व निलोफर बानो मोहम्मद आशिक उपस्थित होते. शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष नूरुलहसन कुरेशी व फिरोज खान यांची उपस्थिती होती. निवृत्त शिक्षक मोहम्मद साबीर,



रिजवान खान व अय्यूब खान पठाण यांचा सत्कार करण्यात आला. चित्रकला व वक्तृत्व स्पर्धांमधील गुणवंत विद्यार्थ्यांना पारितोषिके देण्यात आली. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मुख्याध्यापक डॉ. अब्दुल करीम देशमुख, नाहिद अख्तर इनामुर्रहिम शेख, शिक्षकवृंद व माजी विद्यार्थी संघाने परिश्रम घेतले. या उपक्रमाला विद्यार्थी व पालकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

## कापूस बाजारातून दुचाकी चोरी

**अमरावती** - शहरातील रहिवासी संजय मधुकर एकलारे हे एमएच 27/एएस 7399 क्रमांकाच्या दुचाकीवरून कापूस बाजारात भाजीपाला खरेदीसाठी आले असता अज्ञात चोरट्यांनी त्यांची दुचाकी लंपास केली. या प्रकरणी सोमवारी संजय एकलारे यांच्या तक्रारीवरून सिटी कोतवाली पोलिसांनी अज्ञात व्यक्तींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरू आहे.

# एकताई, सलीता व भांडुम गावे अंधारात

## महावितरणच्या निष्काळजीपणावर संताप ■ मेळघाटचे भीषण वास्तव, आदिवासींचा प्रवास अजूनही अंधारात



**महासागर प्रतिनिधी**

**चुरणी,( दि.20 )** - मेळघाटातील अतिदुर्गम भागातील एकताई, सलीता व भांडुम ही आदिवासीबहुल गावे गेल्या चार ते पाच महिन्यांपासून अंधारात असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन पूर्णत: विस्कळीत झाले आहे. वीजपुरवठा खंडित असतानाही महावितरणकडून ठोस उपाययोजना करण्यात येत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. आदिवासींच्या नशिबी कायम अंधारच राहणार का? असा सवाल येथील नागरिक उपस्थित करीत आहेत.

वीज नसल्यामुळे रात्रीच्या वेळी गावात असुरक्षिततेचे वातावरण आहे. रस्त्यांवर पूर्ण अंधार असल्याने वन्यप्राण्यांची भीती वाढली असून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. विद्यार्थ्यांचे मोठे शैक्षणिक नुकसान होत आहे. अभ्यासासाठी दिवे व मेणबत्त्यांवर अवलंबून राहावे लागत असून मोबाईल चार्जिंगसारख्या मूलभूत सुविधाही उपलब्ध नसल्याने आपत्कालीन प्रसंगी संपर्क तुटतो, ही अत्यंत गंभीर बाब आहे.

आरोग्य सेवांवरही याचा मोठा परिणाम झाला आहे. आरोग्य उपकेंद्रांमध्ये वीज नसल्यामुळे लसीकरण, औषध साठवणूक व प्राथमिक तपासण्या अडचणीत सापडल्या आहेत. गर्भवती महिला, लहान मुले व ज्येष्ठ नागरिकांना याचा मोठा फटका बसत आहे. तसेच पाणीपुरवठा योजनाही वीजअभावी ठप्प झाल्याने ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी भटकंती करावी लागत आहे.

### वारंवार 'तांत्रिक बिघाडा'ची कारणे

स्थानिक नागरिकांच्या मते तांत्रिक बिघाड अशी कारणे वारंवार दिली जातात; मात्र दुरुस्तीची कामे वेळेत होत नाहीत. तक्रारी करूनही फक्त आश्वासनांपुरतेच समाधान दिले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. महिनोनमहिने अंधारात ठेवणे म्हणजे आदिवासींकडे होत असलेले सरळ दुर्लक्ष असल्याची भावना व्यक्त होत आहे. दरम्यान, लोकप्रतिनिधींनी तातडीने लक्ष घालून दुरुस्ती पथक पाठवावे व भविष्यात वारंवार वीज खंडित होऊ नये यासाठी कायमस्वरूपी उपाययोजना कराव्यात, अशी जोरदार मागणी करण्यात आली आहे. अन्यथा आंदोलनाचा इशाराही ग्रामस्थांनी दिला आहे. विकासाच्या गप्पा सुरू असताना चार-पाच महिन्यांचा अंधार प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करीत आहे. महावितरणने तात्काळ पावले उचलून वीजपुरवठा सुरळीत करावा, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

# येवदा व्यापाऱ्यांवर उपासमारीची टांगती तलवार



दुकाने हटवण्याच्या नोटिसांविरोधात व्यापारी संघाचे निवेदन, पर्यायी जागेची मागणी

**महासागर प्रतिनिधी**

**दर्यापूर, ( दि. 20 )-** येवदा येथील राज्य मार्गालगत मागील अनेक वर्षांपासून व्यवसाय करून कुटुंबाचा उदरनिर्वाह करणाऱ्या छोट्या व्यापाऱ्यांना सार्वजनिक बांधकाम विभागाने दुकाने हटवण्याच्या नोटिसा बजावल्याने परिसरात चिंतेचे वातावरण निर्माण झाले आहे. या नोटिसांमुळे अनेक गरीब कुटुंबांवर उपासमारीची वेळ येण्याची शक्यता निर्माण झाली असून, याविरोधात आज 'येवदा व्यापारी संघा'च्या वतीने प्रशासनाला निवेदन देण्यात आले.

येवदा बस स्थानक व महामार्ग परिसरात पिढ्यान्पिढ्या ग्रामस्थ छोटे-मोठे व्यवसाय करीत आहेत. मात्र, सार्वजनिक बांधकाम उपविभाग क्र. 5, दर्यापूर यांनी 9 जानेवारी रोजी नोटीस जारी करून 18 जानेवारीपर्यंत जागा रिकामी करण्याचे आदेश दिले आहेत. त्यामुळे हातावर पोट असलेल्या व्यापाऱ्यांचे भवितव्य धोक्यात आले आहे.

या पार्श्वभूमीवर अध्यक्ष नितीन बढे व सचिव सचिन बोदडे यांच्या नेतृत्वाखाली व्यापाऱ्यांच्या शिष्टमंडळाने उपविभागीय अभियंता व तहसीलदार यांची भेट घेऊन आपली कैफियत मांडली.

केवळ कायदेशीर बाबी न पाहता मानवी दृष्टिकोनातून विचार करावा, अशी मागणी त्यांनी केली. विस्थापनापूर्वी पर्यायी जागा उपलब्ध करून दिल्यास आमचा रोजगार सुरू राहील, असे व्यापाऱ्यांनी स्पष्ट केले. सोमवारी सकाळी व्यापारी मोठ्या संख्येने व शिस्तबद्ध पद्धतीने तहसील कार्यालयाबाहेर एकत्र आले होते. यावेळी नितीन बढे, सचिन बोदडे, सत्ययोग हिरुळकर, राम रघुवंशी यांच्यासह संघाचे सदस्य व स्थानिक विक्रेते उपस्थित होते.

RNINO-46975/1985 Dainik Mahasagar Amravati
Printed, published and owned by Shrikrishna Tansukhdas Chandak; printed at Arunodaya Press, Cotton Market, Nagpur-440018 and published at Dainik Mahasagar Office, Hotel Tourist Beside Railway Station square, Amravati. Amravati head office, address: Dainik Mahasagar, Hotel Tourist beside Railway Station square, Amravati, phone no. 9518934504.
Group Editor-in-Chief and Managing Director- Shrikrishna Tansukhdas Chandak, Group Editor - Sandeep Ramrao Kale, Managing Editor - Pankaj Shrikrishna Chandak.

आर.एन.आय. नोंदणी क्रमांक ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर, ४४००१८, येथे छापून, दैनिक महासागर कार्यालय, हॉटेल टुरिस्टच्या बाजूला, रेल्वे स्टेशन चौक, अमरावती, येथे प्रकाशित केले. मुख्य संपादक व मॅनेजिंग डायरेक्टर : श्रीकृष्ण तनसुखदास चांडक, समूह संपादक : संदीप रामराव काळे, प्रबंध संपादक : पंकज श्रीकृष्ण चांडक

